नांदेड, व कोल्हापूर, येथील प्रादेशिक योजना कार्यालये त्याचे नामाभिदान बदलून अनुक्रमे उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, नागपूर महानगरपालिका, नागपूर व उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर येथे पदांसहीत स्थानांतरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन निर्णय क्र. विघयो-३७१९/प्र.क्र.४१/नवि-२७,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

चौथा मजला, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक :- २७ मे, २०१९.

<u>वाचा :-</u> १. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.टिपीव्ही-१९०७/११०८/प्र.क्र.१९८/०७/नवि-२७, दि.१७ डिसेंबर, २००७.

२. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.नागपूर वियोविघ/अर्थसंकल्प/६३९२, दि.०५.११.२०१८.

३. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.प्रादेशिक योजना/अर्थसंकल्प/८९४, दि.१६.०२.२०१९.

४. महापौर,कोल्हापूर महानगरपालिका,कोल्हापूर यांचे पत्र क्र.नगर रचना विभाग/वशि-१/२८८५/२०१९, दिनांक २१.०२.२०१९

४. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. आस्था/कोल्हापूर वियाविघ/अर्थसंकल्प/२६३६, दि.०३.०५.२०१९.

५. शासन निर्णय क्र.मुदवा-४३१८/३४०/प्र.क्र.३७/नवि-२७, दि.२७.०२.२०१९

<u>प्रस्तावना :-</u>

संचालक, नगर रचना,पुणे यांनी उपरोक्त वाचा येथील अ.क्र.२ येथील दि.०५.११.२०१८ व अ.क्र.५ येथील दि.०३.०५.२०१९ च्या पत्रान्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उप संचालक,नगर रचना, प्रादेशिक योजना,नांदेड, उप संचालक,नगर रचना,प्रादेशिक योजना, कोल्हापूर, या २ प्रादेशिक योजना घटकांचे काम पूर्ण झाले असल्याने सदर कार्यालये स्थलांतरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

<u>शासन निर्णय:-</u>

नागपूर शहराची विकास योजना दुसऱ्यांदा सुधारीत करण्यासाठी व कोल्हापूर शहराची विकास योजना तिसऱ्यांदा सुधारित करणेकामी शासनाकडून पायाभूत नकाशा (बेस मॅप) व विद्यमान भूवापर नकाशा (ई.एल.यु.) तसेच प्रस्तावित भूवापर नकाशा (पी.एल.यू) तयार करणेसाठी सध्या अस्तित्वात असलेली नांदेड, व कोल्हापूर, येथील प्रादेशिक योजना कार्यालये त्याचे नामाभिदान बदलून अनुक्रमे उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, नागपूर महानगरपालिका, नागपूर व उपसंचालक, नगर रचना, विकास योजना,विशेष घटक,कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर येथे पदांसहीत स्थानांतरीत करण्यास, स्थलांतरीत करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	सध्याच्या प्रादेशिक योजना घटक कार्यालयाचे नांव	सुधारित करावयाच्या विकास योजना, विशेष घटक कार्यालयाचे नांव	सुधारित करावयाच्या विकास योजना, विशेष घटक कार्यालयाचे मुख्यालय	सुधारित करावयाच्या मंजूर विकास योजना, विशेष घटक
१	२	३	४	५
१	उपसंचालक, नगर रचना प्रादेशिक योजना, नांदेड	उपसंचालक, नगर रचना, विकास योजना,विशेष घटक, नागपूर महानगरपालिका, नागपूर	नागपूर	नागपूर शहराची विकास योजना दुसऱ्यांदा सुधारीत करणे.
२	उपसंचालक, नगर रचना प्रादेशिक योजना, कोल्हापूर	उपसंचालक, नगर रचना विकास योजना, विशेष घटक.कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर	कोल्हापूर	कोल्हापूर शहराची विकास योजना तिसऱ्यांदा सुधारित करणेकामी शासनाकडून पायाभूत नकाशा (बेस मॅप) व विद्यमान भूवापर नकाशा (ई.एल.यु.) तसेच प्रस्तावित भूवापर नकाशा (पी.एल.यू) तयार करणे.

०२. उक्त विकास योजना, विशेष घटक तयार करण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या नांदेड, व कोल्हापूर प्रादेशिक योजना कार्यालयातील खालीलप्रमाणे नमूद पदे आदेशाच्या दिनांकापासून संबंधित विकास योजना, विशेष घटक कार्यालयांकडे वर्ग करण्यास शासनाची याद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	कार्यालयाचे नाव व कार्यालयनिहाय मंजूर पदे	
		उप संचालक, नगर रचना विकास योजना,विशेष घटक. नागपूर महानगरपालिका,नागपूर	उप संचालक, नगर रचना विकास योजना, विशेष घटक, कोल्हापूर महानगरपालिका कोल्हापूर
१	२	३	४
१	उपसंचालक	०१	०१
२	सहायक संचालक	०	०१
३	नगर रचनाकार	०१	०१
४	सहाय्यक नगर रचनाकार	०२	०३
५	रचना सहायक	०३	००
६	स्वीय सहायक /उच्चश्रेणी लघुलेखक	०१	०१

७	संशोधन सहायक	००	०१
८	सांख्यिकी सहायक	००	००
९	प्रमुख आरखेक	००	०१
१०	सहायक आरेखक	०१	०१
११	कनिष्ठ आरेखक	०३	०२
१२	अधिक्षक	००	०१
१३	प्रथम लिपीक	००	०१
१४	वरिष्ठ लिपीक	०१	००
१५	कनिष्ठ लिपिक/लिपीक टंकलेखक	०२	०२
१६	वाहन चालक	००	०१
१७	निलमुद्रक	००	०१
१८	दप्तरबंद	००	०१
१९	शिपाई	०३	०४
	एकूण पदे	**१८**	**२३**

०३. दिनांक २७.०२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग, पुणे यांच्या आस्थापनेवरील अस्थायी पदांना दिनांक ३०.०९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. वरील कार्यालयाची पदे संबंधित विकास योजना, विशेष घटक कार्यालयाकडे वर्ग करण्यात आल्यानंतर सदर अस्थायी पदांची मुदतवाढ दिनांक ३०.०९.२०१९ पर्यंत चालू राहील. तसेच प्रस्तुत पदांचे अनुज्ञेय वेतन व भत्ते तसेच आस्थापना खर्च (कार्यालयीन वाहन, दूरध्वनी, संगणक, स्टेशनरी, फर्निचर इत्यादी) संबंधित महानगरपालिके मार्फत वहन करण्यात येईल.

०४. उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, नागपूर महानगरपालिका, नागपूर व उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक,कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांना संबंधित कार्यालयाचे “कार्यालय प्रमुख” व “नियंत्रण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे तसेच संबंधित कार्यालयाचे “आहरण व संवितरण अधिकारी” घोषित करण्याची कार्यवाही संबंधित कार्यालय प्रमुखाने करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक २०१९०५२७१०३८४५६१२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Nitin Balkrishna Shelke

Digitally signed by Nitin Balkrishna Shelke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Deaprtment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b16a0c5db615c4a06ea8fabd13af127400ce480c79ca9b8e4bf887b336c689c6, cn=Nitin Balkrishna Shelke
Date: 2019.05.31 16:07:25 +05'30'

(नि.बा.शेळके)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत:-

१. मा.राज्यपाल महोदयांचे प्रधान सचिव

२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव
३. मा.राज्यमंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव
४. मा.प्रधान सचिव (नवि-१) यांचे स्वीय सहाय्यक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. मा.प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहाय्यक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सर्व विभागीय आयुक्त
७. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे (पाच प्रतीसह)
८. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर.
९. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
१०. आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
११. जिल्हाधिकारी, नागपूर/कोल्हापूर/नांदेड.
१२. सह सचिव तथा संचालक नगररचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३. उप सचिव, नवि-०४, नवि-०९, नवि-१२, नवि-१३, नवि-३०, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. सर्व विभागीय सहसंचालक, नगर रचना,-----------------------------
१५. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/कोल्हापूर/नांदेड.
१६. उपसंचालक, नगर रचना प्रादेशिक योजना, नांदेड
१७. उपसंचालक, नगर रचना प्रादेशिक योजना, कोल्हापूर
१८. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. निवडनस्ती/नवि-२७.

****